# स्मार्टफोनसाठीही परवाने आणावेत का?

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राने भारतातच नाही, तर संपूर्ण जगभरात मोठी क्रांती घडवून आणली. मात्र या क्षेत्रामुळे सामाजिक-कौटुंबिक आव्हानेही उभी राहिली आहेत. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचेच उत्पादन असलेल्या स्मार्टफोनच्या आहारी आज लहान मुलेही गेल्याचे दिसते. त्यामुळे पालकांना एक प्रकारची हतबलता आली आहे. हे असे हतबल होण्यापेक्षा स्मार्टफोन वापरासाठीही परवाने आणावे का हा विचार करायची गरज आहे', असे मत माजी खासदार आणि कौन्सिल ऑफ इंडियन कल्चर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी व्यक्त केले.



**माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी मांडले मत**

भारताच्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राची रंजक कहाणी मांडणाऱ्या हरिश मेहता लिखित 'अतुलनीय' या ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच माटुंग्याच्या वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सहस्रबुद्धे यांच्यासह आयआयटी मुंबईतील प्रख्यात प्राध्यापक डॉ. दीपक फाटक,



उद्योजक दीपक घैसास यांच्यासह 'वेलिंगकर'चे संचालक डॉ. उदय साळुंखे उपस्थित होते.

हरिश मेहता यांनी 'अतुलनीय' या ग्रंथात भारताच्या अर्वाचीन काळातील या माहिती-तंत्रज्ञानरूपी भाग्य उजळल्याचे यथोचित प्रवासवर्णन केले आहे, असे सांगत डॉ. सहस्रबुद्धे यांनी या ग्रंथाचे कौतुक केले. माहिती-तंत्रज्ञानामुळे भारताची प्रतिमा सुधारण्याऐवजी सोशल मीडियामुळे ती अधिक डागाळली आहे. ती सुधारण्यासाठी काय करता येईल, याकडे लक्ष देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

'प्रसारमाध्यमांना लागू असलेले नियम समाजमाध्यमांनाही लागू व्हायला हवेत. समाजमाध्यमांवर लोक फक्त माहिती टाकत नाहीत, तर आपले मतही टाकतात. ते अनेक कायद्यांचे उल्लंघन करणारे असू शकते. त्यामुळे संसदेच्या स्थायी समितीचे सदस्य असताना यावर चर्चा झाली', असे त्यांनी सांगितले. तसेच लहान मुलांच्या हाती स्मार्टफोन पडल्याने होत असलेले दुष्परिणामही त्यांनी विशद करत स्मार्टफोन वापरासाठी लायसन्स लागू करण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

या ग्रंथातील विविध प्रकरणांचा अत्यंत प्रभावी गोषवारा मांडताना डॉ. उदय साळुंखे यांनी ग्रंथातील मर्मस्थानांचे कौतुक केले. त्याशिवाय दीपक घैसास यांनी लेखक हरिश मेहता यांची प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीत हरिश मेहता यांनी १९८०-९० या दशकांमधील काळ जिवंत करत विविध आव्हानांबद्दल भाष्य केले.

# “India’s Digital Story Gets a Marathi Voice with ‘Atulniya’ Launch at WeSchool

India’s remarkable rise as a global technology powerhouse found a new voice in Marathi with the launch of ‘Atulniya’, the regional adaptation of Harish Mehta’s acclaimed book The Maverick Effect. The event was hosted at the Prin. L.N. Welingkar Institute of Management Development and Research (WeSchool), Matunga,Mumbai, where WeSchool played a pivotal role as both Venue Partner and Knowledge Partner. The launch marked a significant step toward making India’s digital narrative more inclusive and accessible to regional audiences.

The ceremony was graced by Dr. Vinay Sahasrabuddhe, President of the Indian Council for Cultural Relations, as the Chief Guest. Joining him were distinguished personalities including Mr. Deepak Ghaisas, celebrated entrepreneur, and Padma Shri awardee, Professor Dr. Deepak Phatak from IIT Bombay. The Marathi translation, undertaken by Madhavi G. R. Kamat, was widely appreciated for preserving the essence, depth, and energy of the original work—offering Marathi-speaking readers a compelling insight into India’s IT revolution.

Chief Guest Dr. Vinay Sahasrabuddhe shared valuable insights and key takeaways from the book, offering his perspective on the IT revolution through a mix of humorous anecdotes and socio-cultural reflections.

Delivering the keynote address, Professor Dr. Uday Salunkhe, Group Director of WeSchool, reflected on the power of storytelling in shaping future generations. He highlighted how regional language narratives like ‘Atulniya’ can create stronger emotional and cultural connections, ultimately fostering a deeper impact on aspiring entrepreneurs and changemakers.

> *He further added, “The Marathi edition of The Maverick Effect is more than a translation—it’s an invitation to every student, educator, and changemaker to witness how conviction, collaboration, and courage built a revolution. As someone who believes that learning goes beyond the classroom, I feel this book should be read by everyone—because it teaches us that leadership isn’t about titles, it’s about purpose, passion, and perseverance.”*
>
> ***Mr Anand Limaye the Publisher of the book at the event** said “The Marvik Effect is more than just a book on India’s IT revolution—it’s a compelling story of grit, vision, and transformation. What struck me most was how it captures the human side of technology, the courage to innovate, and the resilience behind real change. We decided to publish the Marathi edition so this powerful story could reach readers across Maharashtra, inspiring young minds, entrepreneurs, and changemakers to believe in the impossible.”*
>
> ***Mr Harish Mehta the author of the book and founding member of NASSCOM** said “The evolution of India’s IT sector is not just a story of technology, but of vision, resilience, and nation-building. Through my book, I’ve chronicled this incredible Indian journey from its nascent stages to its global standing today. With the Marathi edition now available, I’m hopeful this story will resonate even deeper—reaching grassroots readers across Maharashtra and inspiring a new generation of changemakers.”*

Adding to the spirit of celebration, the event also recognised three young entrepreneurs for their outstanding contributions to innovation and enterprise: Aditya Kulkarni (Co-founder, CareNX Innovations), Jaideep Pawar (Founder & CEO, GRAMePAY), and Alisha Shirodkar (Co-founder & CEO, Hotchaa). Their journeys mirror the core themes of ‘Atulniya’—vision, resilience, and the relentless pursuit of purpose. With the combined efforts of Inking Innovations and WeSchool, the event became more than a book launch—it was a tribute to India’s entrepreneurial spirit and an invitation to the next generation to dream, lead, and build.